# महा वितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

क्र.दसु/अंमल/पो.स्टे/ No C 1688 परिपत्रक  05 JUL 2008

प्रती,
सर्व फिरते पथक व दक्षता विभाग प्रमुख

विद्युत कायदा, २००३ कलम १३५ व १३८ अंतगर्त वीज चोरीचे गुन्हे दाखल करुन जलद गतीने तपास करुन खटले निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यात एकूण सहा महावितरण पोलीस ठाण्यांची स्थापना केलेली आहे, हे आपणास विदितच आहे. महावितरण कंपनींची स्वतंत्र पोलीस ठाणी राज्यात कार्यरत असल्याचे विचारात घेवून राज्यातील कांही स्थानिक पोलीस ठाण्यात वीज चोरीचे गुन्हे दाखल करुन घेण्यास नकार देण्यात येत असल्याच्या घटनांचा परामर्श घेवून महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्रमांक पीओएस-३१०८/७३६/प्र.क्र.२१४/पोल-३ दिनांक १३ जून, २००८ नुसार यापुढे वीज चोरीचे गुन्हे महावितरण पोलीस ठाण्या व्यतिरिक्त स्थानिक पोलीस ठाण्यामध्येही नोंदविता येतील, अशा सुचना जारी केल्या आहेत.

सदर परिपत्रकाची प्रत पुढील कारवाईसाठी सोबत जोडली असुन महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या सदर परिपत्रकामुळे महावितरण कंपनीच्या अभियंत्यांना स्थानिक पोलीस ठाण्यात वीज चोरीचे गुन्हे नोंदविता येतील.

(पुरोहित)
संचालक(दवसु)करिता
म.रा.वि.वि.कं.मर्या.,मुंबई.

सोबतः वरील प्रमाणे

प्रत माहितीकरीता सादर
१. संचालक(संचलन) म.रा.वि.वि.कं.मर्या.,मुंबई

प्रत माहिती व योग्य त्या कारवाई करीता
२. कार्यकारी संचालक(१,२,३) म.रा.वि.वि.कं.मर्या.,मुंबई
३. सर्व मुख्य अभियंते
४. सर्व अधिक्षक अभियंते
५. सर्व कार्यकारी अभियंते/उप कार्यकारी अभियंते/सहाय्यक अभियंते
संचलन व सुव्यवस्था - प्रेषण यादी प्रमाणे.

०२०७०८

srn/pos-3108-12-cr-17

महाराष्ट्र शासन,<br>गृह विभाग,<br>शासन परिपत्रक क्रमांक पीओएस- ३१०८/७३६/प्र.क्र.२९१/पोल-३<br>मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२, दिनांक: १३ जून ,२००८

पहा :- १) गृहविभाग शासन निर्णय क्रमांक- पीओएस- ३६०३/१२/प्र.क्र.१७/पोल-३,
दिनांक ३१ जानेवारी,२००६
२) गृहविभाग अधिसूचना क्रमांक-टिटीसी ३६०६/४२७/प्र.क्र.५/पोल-३
दिनांक १ जूले २००६

परिपत्रक -

महाराष्ट्र राज्यात विद्युत मंडळाच्या वीज चोरीला आळा घालण्यासाठी तसेच वीज चोरी प्रकरणाचा तपासपूर्ण करुन खटले त्वरीत निकाली काढून,खटल्यात अंतर्भूत असलेली रक्कम वसूल करुन महसूल वाढविण्यासाठी दि.३१ जानवारी,२००६ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये कल्याण,पुणे,नाशिक,जालना,लातूर व नागपूर या सहा ठिकाणी स्वतंत्र सहा पोलीस ठाणी निर्माण करण्यात आलेली आहेत. या पोलीस ठाण्यांचे कार्यक्षेत्र प्रत्येकी कमीत कमी ४ व जास्तीतजास्त ९ जिल्ह्यांचे मिळून निश्चित करण्यात आलेले आहे.या विस्तारीत कार्यक्षेत्राचा विचार करता विजचोरी संबंधातील गुन्हे तत्परतेने त्याच पोलीस ठाण्यांमध्ये नोंदविणे ब-याचदा शक्य होत नसल्याने व अशा प्रकारचे गुन्हे नोंद करण्यास स्थानिक पोलीस ठाणे नकार देत असल्याचे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.या अनुषंगाने शासन आदेश देत आहे की, यापुढे अशा प्रकारचे गुन्हे स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये दखल नोंदता येतील व तसे नोंदवून ते संबंधित महाराष्ट्र राज्य विज वितरण मर्यादित पोलीस ठाण्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यांना कळविण्यात यावे.तसेच परिक्षेत्रीय/जिल्हा स्तरावरुन काढलेले आदेश, जे या आदेशाशी सुसंगत नाहीत ते रद्द करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( यशवंत बुधवंत )
कार्यासन अधिकारी,, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

१. पोलीस महासंचालक ,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. सर्व पोलीस आयुक्त,
३. सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
४. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.

प्रत माहितीस्तव-

प्रधान सचिव,उद्योग ऊर्जा व कामगार विभाग.
कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित,वांद्रा (पूर्व)